Date
Page ①

# सप्तपदी

आजच्या काळात लग्नप्रसंगाचे गांभिर्यच निघून गेलेले आहे असे वाटते. विवाह हा संस्कार न रहाता समारंभ बनला आहे. त्यात पावित्र्यापेक्षा, मंत्र श्रवणापेक्षा प्रदर्शनाचे अधिक मुल्य समजले जात आहे. जीवनाची योग्य रितीने मांडणी करण्याची कला हीच सफल जीवनाची किल्ली होय. लग्न म्हणजे पुरुषाचे कर्तृत्व आणि स्त्रीच्या समर्पणाचे सुभग मिलन !! पुरुष हा गद्य असेल तर स्त्री पद्य आहे. आणि या गद्य-पद्याच्या संग्रहाचे नांव 'जीवन' आहे.

नदी जशी स्वतःचा रंग, रुप, आकार व स्वाद ह्यांचा त्याग करून सागरात मिसळून जाते तशी स्त्री देखील स्वतःचे व्यक्तित्व पुरुषात एकरुप करुन टाकते. दुधात मिसळलेली साखर दिसत नाही तरीही दुधाचा गोडवा वाढवते. त्याचप्रमाणे स्त्री पुरुषाच्या जीवनाची मधुरता वाढवते. पतिपत्नीच्या जीवनात काहीतरी महान ध्येय असले पाहिजे. पतीच्या तेजासमोर झुकण्यात स्त्रीला आनंद आणि पत्नीचा खरा सन्मान करण्यात पुरुषाला प्रसन्नता वाटली पाहिजे.

पतीपत्नीचे संबंध प्रेमाच्या उर्जेने युक्त, भावार्द्रतेने भरलेले, विश्वासपूर्ण आणि संशयापासून दूर असले पाहिजे. Marriage हा शब्द सुध्दा वैवाहिक जीवनात आवश्यक गुण सुचवतो.

M – Meraging = आत्मसमर्पण
A – Ambition = महत्वाकांक्षा
R – Respect = सन्मान
R – Response = प्रतिसाद
I – Intimacy = दृढपरिचय
A – Accredition = विश्वास
G – Gaiety (Gaiety) = आनंद
E – Eternity = शाश्वतता

लग्न हे आजीवन सोबत राहण्याचे व्रत आहे. दीक्षा आहे आणि सप्तपदी ही चिरसहवासाच्या प्रतिज्ञेचे प्रतीक आहे. आज व्यक्तिस्वातंत्र्याचा वारा चौफेर पसरू लागला आहे. संसारातील काव्य कोमेजू लागले आहे. विवाह संस्काराचे पावित्र्य समजून घेतले पाहिजे. स्त्रीसाठी लग्न हे नव्या अवतारासारखे आहे. नवे जीवन, नवे वातावरण, नवे संबंध तिला आत्मसात करायचे असते. सात पावलं बरोबर चालल्याने मैत्री होते असे शास्त्रवचन आहे. म्हणूनच विवाहात सप्तपदीचे आगळे महत्त्व आहे. यात कन्या प्रत्येक पावलाला अनुक्रमे सात प्रतिज्ञा करते.

१) हे देवा, मी जन्मोजन्मी विविध प्रकारे केलेल्या पुण्याच्या प्रतापाने तुझ्या प्राप्तिरूपात मला सौभाग्य मिळाले आहे; असे वराला पहिले पाऊल टाकतांना सांगते. पती तिला स्वतःचा सर्वस्व वाटतो. त्याची प्राप्ती म्हणजे जन्मजन्मांतरीच्या पुण्यकर्माचे फळ मानते.

२) मी कुटुंबातील लहान थोरांच्या अपेक्षांची पुर्ती करीन. निर्वाहासाठी मला जे मिळेल त्यात संतोष मानेन, असे कन्या वराला दुसरे पाऊल टाकतांना सांगते. म्हणजेच स्त्री केवळ पतीशीच नव्हे तर संपुर्ण कुटुंबाशी जोडली जाते. संतोषाशिवाय सुख नाही, त्यामुळे कुटुंबातील सर्वांना आनंदी ठेवण्याची जबाबदारी ती घेते.

३) मी प्रतिदिन तुमच्या आज्ञेचे पालन करीन आणि वेळेवर गोड अन्न, शाकादि तयार करून देईन. असे वचन कन्या तिसरे पाऊल टाकतांना वराला देते. स्त्री ही भोजनगृहाची राणी समजली जाते. मधुर वातावरणात जेवतात ते मिष्टान्न. त्यासाठी गोडच पदार्थ असले पाहिजे असे नाही. भांडणयुक्त वातावरणात मिष्टान्नदेखील विषासारखे वाटते तर प्रेमळ संबंध कोरड्या भाकरीतही माधुर्य आणतात.

Date
Page 3

४) मी तनामनाने तुला सर्वस्व अर्पण करेन मन, वाणी, मधुर सुरांनी तुझे जीवन व्यापून टाकेन असे ती कन्या वराला चौथे पाऊल टाकतांना सांगते. या प्रतिज्ञेत वधू स्वच्छ, पवित्र राहण्याची गोष्ट करते; चतुराई, शृंगार इ. दाम्पत्य जीवनातील महत्वाचा भाग समजतात. पतीची प्रियतमा बनण्याचा प्रयत्न करीन असे वचन देते.

५) दुःखात धीर धरून व सुखात प्रसन्न राहणारी मी तुमच्या सुखदुःखाशी एकरूप होईन. तुमचाच विचार सदोदित माझ्या मनात राहील असे पाचवे पाऊल टाकतांना ती कन्या वराला सांगते. सुख वाटल्याने वाढते तर दुःख वाटल्याने घटते. या रीतीने सुखाचा गुणाकार व दुःखाचा भागाकार करून स्त्री संसारात स्वर्ग निर्माण करते.

६) मी तुमच्या घरातील कामे सुखपूर्वक करीन. सगळ्यांचा सत्कार करीन. जेथे तुम्ही असाल तेथेच मी राहीन. मी कधीही तुम्हाला फसवणार नाही; आणि मी सुध्दा स्वामीपासून फसणार नाही असे कन्या सहावे पाऊल टाकतांना वराला सांगते. गृहकार्याचा भार वाढू देणार नाही. वडील मंडळींच्या छत्रछायेखाली सुख समाधानाने राहीन. विश्वास हा पतीपत्नीमधील संबंधाचा दुवा आहे.

७) हे स्वामी; होम हवनादि यज्ञकार्यात मी तुम्हाला सहाय्य करेन. धर्म, अर्थ, काम या बाबतीत मी तुमच्याच इच्छेच्या आधीन राहीन. अग्नीदेवता, ब्राह्मण, मातापितादि श्रेष्ठ व्यक्तींच्या साक्षीने तुम्ही माझे सर्वस्व झाला आहात. माझे उर्वरित जीवन तुम्हाला व कुटुंबाला आनंदीत ठेवण्यात खर्च करीन. असे सातवे पाऊल उचलतांना कन्या वराला सांगते. प्रत्येक सत्कार्यात साथ देईन. धर्माचरण करेन. सहधर्मचारीणी म्हणून सतत तुमच्या पाठीशी उभी राहीन. समग्ररूपात मी तुमचीच राहीन असा भाव

वधूच्या मनात निर्माण होतो.

स्वतःच्या सुखोपभोगासाठी आपला पती निस्तेज बनावा किंवा बाहेरील लोकांची लाचारी करीत फिरावा हे पतिव्रता स्त्रीला आवडत नाही. पतीचे तेज टिकवणे ही स्त्रीच्या हातची गोष्ट आहे. अरुंधतीने वसिष्ठांचा संसार असाच तेजस्वी बनवला होता. म्हणूनच लग्नाच्या वेळी वर वधूला 'अरुंधतीचा तारा' दाखवतो. असा विधी आहे. त्याद्वारे अशी सूचना केली जाते की 'तू देखील माझा संसार असाच तेजस्वी बनव'!!

असा सप्तपदीचा अर्थ लक्षात घेवून संसाराची वाटचाल सुरू करावी!! वधूने दिलेली वचने वराने नित्य स्मरणात ठेवावी. आणि दोघांनीही एकमेकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा!!

आज बरेच ठिकाणी संसारात सुसंवाद पाहायला मिळत नाही. नित्याचा विवाद विषवाद निर्माण करतो. अनुरागात बेबनाव प्रवेश करतो. आणि विवाहाचा खरा अर्थ विसरायला होतं. प्रेमाचे दुसरे नाव सहनशीलता आहे. एकमेकांचे गुणदोष सहन करण्याची वृत्तीच सफल लग्नाची जननी बनते. म्हणून लग्नप्रसंगाकडे गांभिर्याने बघावे असे वाटल्यामुळे लिखाणाचा अल्पसा प्रयत्न तरुण वर्गाला मार्गदर्शन ठरो!! हीच अपेक्षा ---

संदर्भ: संस्कृती पूजन.

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी